**वाचा :-** १) शासन निर्णय, क्र. आकृवि-१२९८/प्र.क्र.६१/१५-ए,दि.२९ मे, १९९८.

२) शासन पत्र, कृषी व पदुम विभाग, क्र. आकृवि/१२०२/प्र.क्र.४७१/१५ए,दि.२ जुलै, २००२.

३) शासन निर्णय, साप्रवि, क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या-१२,दि.१५/१२/२०१७.

४) शासन निर्णय, साप्रवि, क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्यासन १२,दि.३० ऑगस्ट, २०१८.

५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेतन- ११९९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३,दि.२ मार्च, २०१९.

६) शासन निर्णय, साप्रवि, क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.१ ऑगस्ट, २०१९.

७) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग, क्र. वेतन-१११०/प्र.क्र.०८/२०१०/सेवा-३,दि.०१ फेब्रुवारी, २०२०.

८) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग, क्र. वेतन-१११९/प्र.क्र.०३/२०१९/सेवा-३,दि.०७ ऑक्टोबर २०२२.

९) मा. आयुक्त (कृषी) यांचे अध्यक्षतेखाली दि. १२/ १० /२०२३ रोजी संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आश्वासित प्रगती योजना समितीने घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त जा.क्र. कृआ/आस्था-६(कक)/आप्रयो/ ज्ये.सू.-२०२२/ प्र.क्र.०५ /३२७८५ /२०२३, दि. १२ / १० /२०२३.

---

*: आदेश :*

शासन परिपत्रक, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्र. आकृवि२०२०/प्र.क्र.१४६/१५-अे, दि. ३१/०५/२०२२ अन्वये **महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब** या संवर्गातील दि. ०१/०१/२०२२ स्थित अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर ज्येष्ठतासूचीनुसार उक्त संवर्गात सन २०१३ मध्ये नियुक्त झालेल्या अधिका-यांना नियुक्तीपासून नियमित १० वर्ष पूर्ण झाल्याने उपरोक्त क्रमांक १ व २ नुसार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारात व संदर्भ क्रमांक ९ च्या बैठकीत मंजूर करण्यात आलेनुसार तीन लाभाच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ **महाराष्ट्र कृषी सेवा गट-अ [कृषी उपसंचालक]** या पदाची (**सुधारीत वेतनस्तर एस-२०(५६१००-१७७५००)**) साखळी पदोन्नतीमधील वेतनश्रेणी खालीलप्रमाणे **रकाना क्रमांक- ५** मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | ज्ये.सू.क्र. | विभाग | अधिकाऱ्यांचे नाव (सर्व श्री.) पदनाम व कार्यालय | वरिष्ठ वेतनश्रेणी देय दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | ३३७ | नागपूर | पद्माकर (पुनम) पुंडलिक गिदमारे, तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, साकोली, जि. भंडारा. | १४-०५-२०२३ |

उपरोक्त अधिकारी यांना मंजूर करण्यात आलेली साखळी पदोन्नतीमधील वेतनश्रेणी खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. सदरहू वेतन श्रेणी वरील **रकाना क्रमांक-५** मध्ये दर्शविण्यात आलेल्या देय दिनांकापासून अंमलात येईल.

२. सातव्या वेतन आयोगानुसार शासन निर्णय क्र. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-१११९/प्र.क्र.३ /२०१९/सेवा-३, दि. २ मार्च, २०१९ व वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२७/कोषा-प्रशा-४, दि. १४/५/२०१९ अन्वये वेतन निश्चिती करावी.

३. सदरहू पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमीत पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चितीत लाभ देण्यात येत आहे. मात्र वेतन निश्चितीत मिळालेला हा लाभ त्या श्रेणीत कार्यात्मक पदोन्नती

मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

४. या योजने अंतर्गत पदोन्नती मिळाली तरी अधिका-याचे नांव कनिष्ठ संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीतच राहील.

५. या आदेशाने देण्यात आलेली साखळी पदोन्नती ही फक्त आर्थिक लाभापुरतीच मर्यादित असून नियमित पदोन्नतीच्या पदावर हक्क सांगता येणार नाही.

६. उपरोक्त अधिका-यांची वेतन निश्चिती करताना शासन निर्णय क्रमांक सा.प्र.वि.एसआरव्हि/१०९५/प्र.क्र.१/९५/१२, दि. ८/६/१९९५ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बंधपत्र लिहून देणे सक्तीचे आहे. त्याप्रमाणे संबधितांकडून बंधपत्र प्राप्त करुन घेऊन एक प्रत सेवापुस्तकात चिटकवावी व एक प्रत या कार्यालयास दयावी.

७. भविष्यात कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर व ती नाकारल्यास संबधितांकडून सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढून घेण्यात येईल.

८. प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या तसेच प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अधिका-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील.

९. वरील कारणाने या योजनेखाली देण्यात आलेले लाभ काढून घेतल्यास संबंधित अधिका-यांची वेतन निश्चिती जणू काही या योजनेचे लाभ दिलेले नव्हते, असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदी नुसार करण्यात येईल.

१०. वरील आदेशातील अधिका-यांच्या सेवाविषयक बाबींची (स्थायी घोषित नोंद, लाभ देय दिनांक, विलेप व संगणक उत्तीर्ण/सूट इ.) त्यांच्या मूळ सेवा पुस्तकावरुन पडताळणी करुनच पुढील वेतननिश्चिती करावी.

११. वरील निकष जे अधिकारी पूर्ण करीत नाहीत त्यांची वेतननिश्चिती न करता याबाबतचा सविस्तर अहवाल आस्थापना विभागास सादर करावा व वरील सर्व बाबींची पूर्तता होत नसतांनाही त्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन निश्चित केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील.

१२. सदर आदेश http://www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच सदर आदेशाची उक्त संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

पुणे :- ४११००१
दि. :- २३ / ०१ /२०२४

**स्वाक्षरीत/-**
**डॉ. प्रवीण गेडाम** भाप्रसे
**आयुक्त, कृषी**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**

---

जा.क्र. कृआ/आस्था-६(कक)/आप्रयो/ज्ये.सू.-२०२२/ प्र.क्र.०५/२७९६/२०२४
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१.
दिनांक :- २५ / ०१ /२०२४.

प्रत :-

१) मा. प्रधान सचिव (कृषी), कृषी.पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२) मा. महालेखापाल, मुंबई/नागपूर.

३) विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर

४) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, भंडारा
५) उपविभागीय कृषी अधिकारी, साकोली, जि. भंडारा
६) कोषागार अधिकारी/ उप कोषागार (सर्व संबंधित).
७) संबंधित कर्मचारी/अधिकारी ------------------------------------------------------------------
८) स्थायी नस्ती.
९) अभिलेख अधिकारी, यांना http://www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी

**कृषी उपसंचालक**
**कर्मचारी कल्याण कक्ष**
**कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.**